Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# आदिवासी बहुउद्देशीय सहकारी सोसायट्यांच्या कार्यक्षेत्रातील मूलभूत सोयी, सुविधा

**प्रा. डॉ. विनोद पी. राजपूत**
संशोधन मार्गदर्शक
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
एस.एस.व्ही.पी.एस.कला, वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय, शिंदखेडा
जिल्हा, धुळे

**मोनल विलास लोहार**
संशोधक विद्यार्थी
कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## प्रस्तावना (Introduction)

जळगांव जिल्हयातील चोपडा, यावल व रावेर हे तिन्ही तालुके आदिवासी उप-योजना क्षेत्रात येतात व हेच आदिवासी बहुउद्देशीय सहकारी सोसायट्यांचे (लॅम्प्स) कार्यक्षेत्र आहे. संशोधन क्षेत्रात आदिवासी बहुउद्देशीय सहकारी सोसायट्या मार्फत ज्या विविध योजना कार्यान्वित केल्या जातात त्या योजना मुळे संशोधन क्षेत्रात मूलभूत सुविधांमध्ये वाढ होत असून अनेक लाभार्थ्यांची घर, निवारा, पाणी, वीज, रस्ते, शिक्षण यासारख्या महत्वाच्या गरजापूर्ण होत असून समस्या सुटण्यास मदत झालेली आहे. संशोधन क्षेत्रामध्ये सरकारी योजनांमुळे आणि आदिवासी बहुउद्देशीय सहकारी सोसायट्यामुळे कश्या प्रकारे मदत झालेली आहे त्याविषयी माहिती सदर शोध पत्रिकेमध्ये मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## संशोधन पद्धती (Research Methodology)

प्रस्तुत शोध निबंधात प्राथमिक स्रोतांवर आधारित संशोधन पद्धती वापरलेली आहे. प्रश्नावली व प्रत्यक्ष पाहणीच्या माध्यमातून उपलब्ध

आकडेवारीच्या आधारावर निष्कर्ष काढलेले असून दुय्यम सामग्रीचा देखील संशोधनात वापर करण्यात आलेला आहे. व त्याच्या साहाय्याने संशोधन पत्रिका तयार केलेली आहे.

**संशोधनाचे उद्देश (Research Objective)**

१) आदिवासी बहुउद्देशीय सहकारी सोसायट्यांच्या योजनांमुळे संशोधन क्षेत्रातील सोयी, सुविधांचा आढावा घेणे.

२) संशोधन क्षेत्रातील सोयी, सुविधांचे मूल्यमापन करणे.

**संशोधनाचे गृहितके (Hypothesis)**

१) आदिवासी बहुउद्देशीय सहकारी सोसायट्यांच्या कार्यामुळे संशोधन क्षेत्रात सोयी, सुविधांमध्ये वाढ होताना दिसत आहे.

आदिवासी बहुउद्देशीय सहकारी सोसायट्यांमार्फत संशोधन क्षेत्रात ज्या विविध योजना उप-योजना क्षेत्रात चालविल्या जातात त्याचा परिणाम म्हणून संशोधन क्षेत्रात काही समस्या सुटण्यास मदत झालेली आहे. आदिवासींच्या अनेक गरजा असून त्या गरजा कमी करण्याचा व गरजा सोडविण्याचे कार्य आदिवासी बहुउद्देशीय सहकारी सोसायट्या (लॅम्प्स) करतांना दिसतात.

**व्यवसायानुसार लाभार्थी वर्गीकरण**

जळगाव जिल्ह्यातील चोपडा, यावल व रावेर तालुक्यातील लाभार्थी कोणता व्यवसाय करतात व कोणकोणत्या मार्गाने उत्पन्न मिळवतात याचे वर्गीकरणात्मक स्वरूप पुढील सारणीत स्पष्ट केलेले आहे.


**सारणी 1**

| तालुका | नमूना लाभार्थी | शेती | शेतमजुरी | जंगल मजुरी | दुध व्यवसाय | नोकरी | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| चोपडा | १०० | ३० (३१) | ४० (३३) | ८ (३०) | ६ (३३) | १० (३२) | ४ (४४) |
| यावल | १०० | ३५ (३७) | ३८ (३१) | १० (३८) | ७ (३८) | ०९ (२९) | १ (११) |
| रावेर | १०० | २९ (३०) | ४२ (३५) | ८ (३०) | ५ (२७) | १२ (३८) | ४ (४४) |
| एकूण | ३०० | ९४ | १२० | २६ | १८ | ३१ | ९ |
| टक्केवारी | १००% | ३१.३३% | ४०% | ८.६६% | ६% | १०.३३% | ३% |

**स्त्रोत** - प्रश्नावलीवरून

वरील सारणी वरून लक्षात येते की आज देखील सर्वात जास्त आदिवासी लोकसंख्या म्हणजे ४० % शेत मजुरीवर अवलंबून आहे. त्या खालोखाल शेती असणाऱ्यांच्या प्रमाणात ३१.३३ % एवढी वाढ झालेली असून ही सकारात्मक बाब आहे. जंगल मजुरी करणाऱ्यांचे प्रमाण ८.६६ % एवढे आहे. गौण वनोपज संख्या कमी झाल्याने व वनराई तोड झाल्याने जंगलांचे अस्तित्व धोक्यात आलेले दिसते.

जळगाव जिल्ह्यातील चोपडा, यावल व रावेर तालुक्यातील व्यवसायानुसार लाभार्थी वर्गीकरण



## आदिवासी मधील साक्षरता

जळगाव जिल्ह्यातील लॅम्प्स सोसायट्यांच्या कार्यक्षेत्रात नमुना पाहणी करतांना त्यात आदिवासी लाभार्थ्यांमध्ये साक्षरतेच्या प्रमाणाचा अभ्यास पुढील सारणीत करण्यात आला आहे.

सारणी २

| अ.क्र. | तालुका | नमूना लाभार्थी | निरक्षरता | साक्षरता |
|---|---|---|---|---|
| १ | चोपडा | १०० | ६१ | ४० |
| २ | यावल | १०० | ४५ | ५५ |
| ३ | रावेर | १०० | ५१ | ४९ |
| | | ३०० (१००%) | १५७ (५२%) | १४४ (४८%) |

**स्त्रोत** - प्रश्नावलीवरून

वरील सारणी वरून लक्षात येते की आदिवासी मधील साक्षरता खूपच कमी आहे सर्वेक्षणाच्या पाहणीनुसार जळगांव जिल्ह्यातील उपयोजना क्षेत्रात म्हणजेच लॅम्प्स सोसायट्यांच्या कार्यक्षेत्रात फक्त ४८% एवढे साक्षरता आहे. हे प्रमाण पूर्वी खूप कमी म्हणजेच ४०% पेक्षा कमी होतो त्यात आता वाढ झालेली दिसते त्याचे कारण शिक्षणाच्या वाढलेल्या सुविधा होय. तसेच निरक्षरतेच्या विचार केला तर ५२% आदिवासी आज देखील निरक्षर आहेत. या ठिकाणी ठोस उपाय योजनेची आवश्यकता दिसते. आदिवासी जंगलात व पाळ्यावर राहतात व आदिवासी स्त्रियांमध्ये खास अनास्था दिसून येते तसेच अंधश्रतेचा पगडा मोठ्या प्रमाणावर असल्याने आदिवासी जमाती शिक्षण घेत नाही शासनाच्या शैक्षणिक सुविधा आदिवासी भागात पोहोचल्या आहेत परंतु आदिवासी अनास्था असल्याने साक्षरता प्रमाण वाढत नाही.

यावल तालुक्यात साक्षरता प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ५५% एवढे आहे तर चोपड्या तालुक्यात साक्षरता प्रमाण ४०% कमी आहे पण पूर्वीपेक्षा साक्षरता

प्रमाण जास्त असून अनेक आदिवासी मुलं शिक्षण घेण्यासाठी होस्टेलवर बाहेरगावी राहत असल्याचे दिसून आले.

**सारणी ३ - शैक्षणिक स्तरानुसार वर्गीकरण**

| तालुका | साक्षरता | फक्त वाचतात | ४ थी पर्यंत | ७ वी पर्यंत | १० वी पर्यंत | १२ वी पर्यंत | पदवी | पदवीत्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चोपडा | ४० | ३ | १५ | १० | ४ | ३ | ३ | २ |
| यावल | ५५ | ४ | २० | १० | ६ | ४ | ७ | ४ |
| रावेर | ४९ | ४ | १८ | ९ | १२ | ४ | २ | १ |
| एकूण | १४४(४८) | ११ | ५३ | २९ | २२ | ११ | १२ | ७ |
| टक्केवारी | १००% | ७.६३% | ३७% | २०% | १६% | ८% | ८.३३% | ५% |

**स्त्रोत** - प्रश्नावलीवरून

वरील सारणीतील संख्याशास्त्रीय माहितीवरून असे निष्कर्ष काढता येतात की एकूण नमुना लाभार्थी ३०० असून त्यापैकी १४४ लाभार्थी म्हणजे ४८% लाभार्थी जळगाव जिल्ह्यात साक्षर आहेत. लॅम्प्स सोसायट्यांच्या कार्यक्षेत्रात चोपडा, यावर व रावेर या तालुक्यांचा विचार केला तर तिन्ही तालुक्यात साक्षरता दर सरासरी ४८% आहे त्यात चोपड्या तालुक्यात सर्वात कमी ४०% व यावल तालुक्यात ५५% एवढा आहे. या एकूण लाभार्थ्यांपैकी ७.६३% लाभार्थ्यांना फक्त वाचता येते. तर ३७% लाभार्थी ४ थी पर्यंत शिक्षण घेतलेले आहेत तर सातवीपर्यंत शिक्षण घेतलेले २०% व दहावीपर्यंत शिकलेल्यांचे प्रमाण १६% एवढे आहे हे प्रमाण पूर्वीपेक्षा वाढलेले दिसते. तर बारावीपर्यंत शिकलेल्यांचे प्रमाण ८% असून पदवीपर्यंत शिकलेल्यांचे प्रमाण ८.३३ एवढे वाढले आहे. तर पदवीत्तर शिक्षणाचे प्रमाण देखील ५% पर्यंत वाढलेले आहे जे प्रमाण पूर्वी शून्य होते याचा असा निष्कर्ष निघतो की शासकीय योजना या आदिवासी भागात व पाळ्यांवर वाढलेल्या असून शैक्षणिक सुविधांचा फायदा आदिवासी काही प्रमाणात घेताना आढळतात.

**घराच्या प्रकारानुसार लाभार्थी वर्गीकरण**

आदिवासी लॅम्प्स सोसायट्यांच्या कार्य क्षेत्रातील नमुना पहाणी वरून लक्षात येते की आदिवासी समाजातील बहुसंख्य लोकांची राहण्याची समस्या सुटलेली असली तरी आज ही झोपडीत व कौलारू घरात राहणाऱ्यांचे प्रमाण देखील जास्त आहे.

पुढील सारणीत घरांच्या प्रकारानुसार वर्गीकरण करण्यात आलेले आहे.

सारणी ३ - घर प्रकार

| **तालुका** | **नमूना लाभार्थी** | **कच्ची घरे** | | | **पक्की घरे** | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **झोपडी** | **कौलाची झोपडी** | **कौलाची घरे** | **पत्राचे छप्पर** | **सीमेंट** | **इतर घरे** |
| चोपडा | १०० | १४ | ३५ | १६ | २० | १५ | ० |
| यावल | १०० | २० | ३० | १९ | १५ | १६ | ० |
| रावेर | १०० | १२ | ३२ | १६ | २० | २० | ० |
| एकूण | ३०० | ४६ | ९७ | ५१ | ५५ | ५१ | ० |
| टक्केवारी | १००% | १५.३३% | ३२.३३% | १७% | १८.३३% | १७% | ० |

**स्त्रोत** - प्रश्नावलीवरून

वरील सारणीतील संख्याशास्त्रीय माहितीवरून असे निष्कर्ष काढता येतात की एकूण नमुना लाभार्थी ३०० असून त्यापैकी सिमेंटच्या घर असलेल्याची टक्केवारी १७ आहे म्हणजे पक्की घर १७% आदिवसी कडे आहेत सर्वात जास्त कौलारू घरात राहणाऱ्यांचे प्रमाण आहे. ते ३२.३३ एवढे आहे. त्या खालोखाल पत्राचे छप्पर १८.३३ % लाभार्थीन कडे आहे. तर झोपडीत राहणाऱ्यांचे प्रमाण १५.३३ % आहे याचा अर्थ असा आहे की संशोधन क्षेत्रात लाभार्थिनची राहण्याची समस्या ८५ % सुटलेली असून फक्त १५ % लाभार्थी घरा वाचून झोपडीत राहत आहेत.

**निवारा / घराची व्यवस्था**

**१) घर/ निवास व्यवस्था -** असे निष्कर्ष काढता येतात की एकूण नमुना लाभार्थी ३०० असून त्यापैकी सिमेंटच्या घर असलेल्याची टक्केवारी १७ आहे म्हणजे पक्की घर १७% आदिवसी कडे आहेत सर्वात जास्त कौलारू घरात राहणाऱ्यांचे प्रमाण आहे. ते ३२.३३ एवढे आहे. त्या खालोखाल पत्राचे छप्पर १८.३३ % लाभार्थीन कडे आहे. तर झोपडीत राहणाऱ्यांचे प्रमाण १५.३३ % आहे याचा अर्थ असा आहे की संशोधन क्षेत्रात लाभार्थिन ची राहण्याची समस्या ८५ % सुटलेली असून फक्त १५ % लाभार्थि घरा वाचून झोपडीत राहत आहेत.

२) **पिण्याचे पाणी** - जिल्ह्यात सन २०२२-२३ मध्ये एकूण १४८७ गावांना बारमाही पाणीपुरवठा उपलब्ध आहे. नद्या, तलाव, साध्या विहिरी व कुपनलिका याद्वारे पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध आहे. पिण्याच्या पाण्याची टंचाई असलेल्या ९२ गावात इतर साधनांनी पाणीपुरवठा करण्यात आला. संशोधन क्षेत्रात चोपडा, यावल व रावेर तिन्ही तालुक्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा असून नळाद्वारे पाणीपुरवठा पाणीपुरवठा १००% गावांना होत आहे. म्हणजे संशोधन क्षेत्रातील शुद्ध पाण्याची समस्या सुटलेली आहे.

**३) शिक्षण** - सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षांमध्ये जळगाव जिल्ह्यात २५६५ प्राथमिक, ८६० माध्यमिक व ६१ माध्यमिक शाळा होत्या जिल्ह्यात दर लाख विद्यार्थ्यां मागे ५० प्राथमिक शाळा तर २० माध्यमिक व ६१ उच्च माध्यमिक शाळा होत्या जिल्ह्यातील प्राथमिक शाळेतील दर शिक्षकामागे विद्यार्थ्यांची संख्या ३० आहे तर माध्यमिक शाळांच्या बाबतीत हेच प्रमाण ३६ आहे.

**४) वीज -** जळगाव जिल्ह्यात २०२२-२०२३ वर्षात ६२४०२०० हजार कि वॅ युनिटचा वापर करण्यात आला. त्यापैकी ७.२% उद्योग, ६५% कृषी, १६.९% घरगुती वापर, २.२% वाणिज्य, २.६% सार्वजनिक दिवाबत्तीसाठी वापर झाला.

**५) उद्योग** - जिल्ह्यात सन २०२२ अखेर ९९४ कारखान्यांची नोंद करण्यात आली असून त्यापैकी ९०६ कारखाने कार्यरत होते कार्यरत कारखान्यात ३४८४५ कामगार

काम करीत होते. जिल्ह्यात प्रामुख्याने खाद्यपदार्थांचे उत्पादन, काच आणि काचेचे उत्पादन, पशु खाद्य तयार करणे, शेतीपूरक क्रिया, दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन, लाकडाचे उत्पादन इत्यादी प्रकारचे कारखाने आहेत.

**६) रस्ते** - जिल्ह्यात मार्च २०२१ अखेर सर्व प्रकारचे मिळून एकूण १५९४१ की.मी लांबीचे रस्ते होते. त्यापैकी संशोधन क्षेत्राचा विचार केला तर चोपडा, यावल व रावेर तिन्ही तालुक्यामध्ये रस्ते विकास आहे. पण त्यातल्यात रावेर तालुका हा रस्त्यांच्या बाबतीत श्रीमंत तालुका आहे. चोपड्या तालुक्यातील काही गावात कच्चे रस्त्या आढळतातश सातपुडा च्या पायथ्याशी असलेल्या काही गावात पावसाळ्यात संपर्क तुटतो काही ठिकाणी पक्के रस्ते आहेत पण काही गावांना कच्चे रस्ते दिसतात काही रस्ते डांबरीकरण झालेले आहे पण आता त्यांची अवस्था दयनीय आहे.

**७) बँका** - सन २०२२-२०२३ मध्ये जिल्ह्यात ३७७ शहर व गावांत बँकेची सुविधा उपलब्ध असून एकूण ५५२ बँक शाखा कार्यरत आहेत.

**८) सहकार** - २०२२-२३ अखेर सहकारी संस्थांची संख्या ३८४० होती एकूण संस्था पैकी कृषी पतसंस्था ८७६, बिगर शेती ७००, पणन ८३, एकूण उत्पादक संस्था १०९२ आणि सामाजिक सेवा संस्था १०८९ आहेत.

## निष्कर्ष (Conclusion )

संशोधनामध्ये आदिवासी भागत आदिवासी बहुउद्देशीय सहकारी सोसायट्यांमार्फत चालविल्या जाणाऱ्या विविध संशोधन क्षेत्रातील योजनांमुळे व शासकीय योजनांमुळे आदिवासींच्या निवारा/ घर, पाणी, वीज, रस्ते, शिक्षण यासारख्या मूलभूत गरजा पूर्ण होण्यास मदत होत आहे. संशोधन क्षेत्रातील लॅम्प्स सोसायट्यांच्या कार्यामुळे आदिवासींचे राहणीमान सुधारत असून त्यांच्या गरजा पूर्ण होण्यास आणि समस्या सुटण्यास मदत होत आहे.

**संदर्भ सूची :-**

१. अर्थ व सांख्यिकीय संचालनालय महाराष्ट्र शासन मुंबई जळगांव जिल्हा समालोचन –२०२२ - २३ पृ.१०,१२
२. कराडे बी.एम. (२०१०) आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, पिंपळापुरे आणि कंपनी प्रकाशक, नागपूर.
३. कुलकर्णी शरद (२००६) महाराष्ट्रातील आदिवासी, किर्लोस्कर जाने - फेब्रु.
४. कोंडेकर ए.वाय.(१९९०) भारतीय आदिवासी समाज, फडके प्रकाशन, कोल्हापुर.
५. खडसे, भा.कि. (२००९) भारतीय सामाजिक समस्या, श्री. मंगेश प्रकाशन, नागपुर.
६. गव्हाणे - गोटे (२००४) महिला सबलीकरण स्वरूप व समस्या, वरद पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
७. गारे. गोविंद (१९९७) सातपुड्यातील भिल्ल, अमृत प्रकाशन, औरंगाबाद.
८. गारे गोविंद (१९९८) आदिवासी विकास योजना, आदिवासी विकास प्रतिष्ठान, पुणे.
९. गारे गोविंद (२०००) आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ, सुगावा प्रकाशन पुणे.
१०. घाटोळे आर्. एन्. (२००८-०९) समाजशास्त्रीय संशोधन तत्वे आणि पध्दती, मंगेश प्रकाशन नागपुर.